जलसंपदा विभागातील अभियांत्रिकी सेवेतील गट-अ (राजपत्रित) व गट-ब (राजपत्रित/ अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदली याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारशी करण्यासाठी नागरी सेवा मंडळ स्थापन करण्याबाबत

महाराष्ट्र शासन,
जलसंपदा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : नासेमं २०१४/(प्र.क्र.१८/१४)/आस्था (संनि)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : **२२ ऑगस्ट २०१९**

<u>वाचा</u> :- (१) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्रमांक : नासेमं २०१४/(प्र.क्र.१८/१४)/आस्था (संनि), दिनांक २९.८.२०१५.
(२) जलसंपदा विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक : नासेमं २०१४/(प्र.क्र.१८/१४)/आस्था (संनि), दिनांक १६.०९.२०१५.

जलसंपदा विभागातील क्षेत्रिय स्तरावरील गट-अ (राजपत्रित) व गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदल्यांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी वाचा क्रमांक १ येथील दिनांक २९.८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये नागरी सेवा मंडळांची स्थापना करण्यात आली असून, वाचा क्रमांक २ येथील दिनांक १६.९.२०१५ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये नागरी सेवा मंडळ (१)-ब व नागरी सेवा मंडळ (१)-ग मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार नागरी सेवा मंडळ (१)-अ, नागरी सेवा मंडळ (१)-ब व नागरी सेवा मंडळ (१)-ग मध्ये सह/उप सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय हे सदस्य आहेत. तथापि, उप सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांच्याकडे असलेल्या कार्यबाहुल्यामुळे त्यांना प्रत्येक बैठकीस उपस्थित राहणे शक्य होत नाही. यास्तव, उक्त नमूद नागरी सेवा मंडळांची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

<u>शासन निर्णय :-</u>

जलसंपदा विभागातील क्षेत्रिय स्तरावरील गट-अ (राजपत्रित) व गट-ब (राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदल्यांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी दिनांक २९.८.२०१५ च्या शासन निर्णयान्वये व दिनांक १६.९.२०१५ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये स्थापन करण्यात आलेल्या नागरी सेवा मंडळ (१)-अ, नागरी सेवा मंडळ (१)-ब व नागरी सेवा मंडळ (१)-ग खालीलप्रमाणे पुनर्रचित करण्यात येत आहे :-

नागरी सेवा मंडळ (१)-अ :- गट-अ (राजपत्रित) संवर्गातील सचिव समकक्ष कार्यकारी संचालक/महासंचालक, मुख्य अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत व यांत्रिकी), अधीक्षक अभियंता (निवडश्रेणी) (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत व यांत्रिकी) व अधीक्षक अभियंता (स्थापत्य/यांत्रिकी/विद्युत व यांत्रिकी) अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदल्यांबाबत सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे नागरी सेवा मंडळाची पुनर्रचना करण्यात येत आहे :-

(१)	प्रधान सचिव (जसंप्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय	अध्यक्ष
(२)	सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय	सदस्य
(३)	सह/उप सचिव (आस्थापना), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	सदस्य

नागरी सेवा मंडळ (१)-ब :- गट-अ (राजपत्रित) संवर्गातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य)/(यांत्रिकी)/(विद्युत व यांत्रिकी) तसेच वैज्ञानिक संशोधन अधिकारी व मृदसर्वेक्षण अधिकारी या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापना, बदल्या करण्याकरिता सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे नागरी सेवा मंडळाची पुनर्रचना करण्यात येत आहे :-

(१)	सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय	अध्यक्ष
(२)	सह/उप सचिव (सेवा), जलसंपदा विभाग, मंत्रालय	सदस्य
(३)	सह/उप सचिव (आस्थापना), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	सदस्य

नागरी सेवा मंडळ (१)-ग :- उपअभियंता/सहायक अभियंता श्रेणी-२/शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्यांची महामंडळाबाहेर अथवा एकाच महामंडळांतर्गत नसलेल्या दोन मुख्य अभियंता कार्यालयांतर्गत बदल्या करण्यास तसेच शासनाच्या थेट नियंत्रणाखाली असलेल्या अधीक्षक अभियंता कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांच्या बदल्यांसंदर्भात सक्षम प्राधिकाऱ्यास शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे नागरी सेवा मंडळाची पुनर्रचना करण्यात येत आहे :-

(१)	मुख्य अभियंता (पा.) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय	अध्यक्ष
(२)	सह/उप सचिव (प्रशा), जलसंपदा विभाग, मंत्रालय	सदस्य
(३)	सह/उप सचिव (आस्थापना), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	सदस्य

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२२१६४००७२१२७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arvind Vitthalrao Pagar

Digitally signed by Arvind Vitthalrao Pagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e73e74e98305e43eb295d08ba37550053b948b587f77b90efdc8b9ff16d8e158, serialNumber=3c4bfae11cba198118c1c28e0ff34686b6c0a82a270584a7daed60418b2f32ca, cn=Arvind Vitthalrao Pagar
Date: 2019.08.22 16:52:30 +05'30'

(अरविंद वि. पगार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव/सचिव (जलसंपदा / लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
३. महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक
४. सर्व कार्यकारी संचालक, सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
५. सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मुख्य अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक
७. महालेखापाल-१/२ , लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
८. महालेखापाल-१/२, लेखा परिक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
९. मा.मंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव
१०. मा.राज्यमंत्री, जलसंपदा यांचे खाजगी सचिव.
११. उप सचिव (सेवा) / उपसचिव (आस्था), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. उप सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सह/उप सचिव (आस्थापना), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. आंतरवित्त सल्लागार व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व अवर सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. कार्यासन अधिकारी - आस्थापना (मंत्रालय) / आस्थापना (तांत्रिक) / आस्थापना (अतांत्रिक),/ आस्थापना (वर्ग-१) / आस्थापना (वर्ग-२) / आस्थापना (स.अ.श्रेणी-२) / आस्थापना (शाखा अभियंता) / गोपनीय शाखा / नोंदणी / रोख शाखा, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. संग्रहार्थ / आस्थापना (संनि)